आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
३ फेब्रुवारी २०२६ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- भारत -अमेरिका व्यापार कराराचं सर्वत्र स्वागत /उद्योग जगतात आनंद,

- युरोपीय देश आणि अमेरिकेबरोबरच्या व्यापार कराराचा मसुदा संसदेत सादर करावा अशी विरोधकांची मागणी/ गदारोळामुळे लोकसभेचं कामकाज तीन वाजेपर्यंत तहकूब

- अहमदाबाद- मुंबई बुलेट ट्रेन प्रकल्पातल्या पालघरमधल्या दुसऱ्या बोगद्याचं खोदकाम पूर्ण झाल्याची रेल्वे मंत्र्यांची घोषणा

**आणि**

- देशात यंदा रबी हंगामातल्या पेरणी क्षेत्रात १५ लाख हेक्टरनं वाढ

**<><><><><>**

भारत-अमेरिका परस्पर शुल्क कपातीबाबतच्या व्यापार कराराचं विविध स्तरातून, विशेषतः उद्योग जगताकडून स्वागत होत आहे. महाराष्ट्र निर्यातीत अग्रेसर असून या करारामुळे राज्यातल्या व्यवसायासाठी नवं क्षितिज खुलं होईल, आणि राज्यात मोठी गुंतवणूक होईल, असा विश्वास  मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केला आहे.

या करारामुळे उभय देशांमध्ये रोजगार निर्मिती, विकास आणि नवोपक्रमांना चालना मिळेल असं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह,  गृहमंत्री अमित शहा, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल, परिवहन मंत्री नितीन गडकरी, धर्मेंद्र प्रधान, किरेन रिजिजू, जे पी नड्डा इत्यादी केंद्रीय मंत्र्यांनी य़ा कराराचं स्वागत करणारे संदेश समाजमाध्यमावर लिहीले आहेत.

**<><><><><>**

भारतातून अमेरिकेत निर्यात होणाऱ्या मालावरचं आयातशुल्क २५ टक्क्यांवरुन कमी करुन १८ टक्क्यांवर आणण्याचं, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी मान्य केल्याची, घोषणा आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावर केली. ही भारताच्या जनतेची ताकद आहे, असं त्यांनी म्हटलं आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनल्ड ट्र्म्प यांनीही याबाबत समाज माध्यमावर संदेश प्रसारित केला आहे. भारतीय उत्पादनांवर अमेरिकेत आयात शुल्क २५ टक्क्यांवरून १८ टक्केपर्यंत कमी केलं जाणार आहे. या संदर्भातल्या व्यापार करारावर दोन्ही देशांनी सहमती दर्शवली असल्याचं ट्रम्प यांनी म्हटलं आहे. भारत रशियाकडून तेल खरेदी थांबवणार असून यापुढं अमेरिकन मालावर भारतात लागणारं शुल्क उतरत्या क्रमानं शून्यावर पोहोचेल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

सीआयआय, फिक्की, रत्न आणि आभूषण उद्योग, पीएचडी सीसीआय, मोबाईल फोन्स, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू आणि संलग्न उत्पादनांच्या निर्यातदारांची संघटना ICEA,मत्स्योत्पादकांची संघटना, अशा विविध उद्योजक आणि व्यापारी संघटनांनी या कराराबद्दल आनंद व्यक्त केला असून, यामुळे भारतीय उत्पादनांना अमेरिकेत उठाव मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

भारत-अमेरिका व्यापार करार हा भारतीय उद्योगक्षेत्रासाठी अतिशय सकारात्मक आणि स्वागतार्ह असल्याची प्रतिक्रिया महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री आणि ॲग्रिकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

***होल्ड... बाईट- ललित गांधी***

**<><><><><>**

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरल्या चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज पुन्हा एकदा चीनचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर झालेल्या गदारोळामुळे लोकसभेचं कामकाज दुपारी तीन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. राष्ट्रपतींनी आपल्या अभिभाषणात राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केला. भारताचे चीन आणि पाकिस्तानशी असलेले संबंध अतिशय महत्त्वाचा विषय आहे, असं राहुल गांधी म्हणाले. यावेळी गांधींनी एका लेखाचा उल्लेख केला. त्यामुळे सत्ताधारी सदस्यांनी त्यांच्या भाषणात व्यत्यय आणला. गदारोळ वाढत गेल्यानं कामकाज तीन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

त्याआधी युरोपियन युनियन आणि अमेरिका यांच्यासोबतच्या व्यापार कराराचा मसुदा सभागृहाच्या पटलावर ठेवावा अशी मागणी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी दोन्ही सभागृहात केली. लोकसभेत विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभापतींच्या आसनासमोर जात घोषणाबाजी केली. त्यामुळे सभापतींनी कामकाज आधी बारा आणि नंतर दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब केलं.

**राज्यसभेत** भारत-अमेरिका व्यापार कराराच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभात्याग केला. काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी शून्य प्रहरात हा मुद्दा उपस्थित केला. त्यावर सरकार भारत - अमेरिका व्यापार करारावर चर्चा करायला तयार असून या कराराची विस्तृत माहिती सभागृहासमोर मांडली जाईल, असं सभागृह नेते जे पी नड्डा यांनी सांगितलं. त्यानंतर सभागृहाचं कामकाज दोन वाजेपर्यंत तहकूब झालं होतं. कामकाज पुन्हा एकदा सुरू झाल्यावर सभागृहात राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरली चर्चा सुरू झाली.

दरम्यान, वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियूष गोयल, आज भारत - अमेरिका व्यापार कराराविषयी संसदेत निवेदन देण्याची शक्यता आहे.

<><><><>

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठीच्या दुसऱ्या बोगद्याचं खोदकाम काम पूर्ण झाल्याची घोषणा रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज केली. महाराष्ट्रात पालघर जिल्ह्यातला हा दुसरा बोगदा असून बुलेट ट्रेन प्रकल्पाचा हा महत्त्वाचा टप्पा आहे. संपूर्ण पथक या प्रकल्पासाठी वेगाने काम करत असून जग भारताच्या पहिल्या बुलेट ट्रेनची प्रगती पाहत आहे, असं वैष्णव म्हणाले. आतापर्यंत ३३४ किलोमीटरचा लोहमार्ग आणि ४१७ किलोमीटरचा घाट आणि पुलांचं बांधकाम पूर्ण झाल्याचं, वैष्णव यांनी सांगितलं.

<><><><>

भारत आणि अमेरिके दरम्यान झालेल्या व्यापार कराराबद्दल एनडीए खासदारांनी आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा सत्कार केला. संसद भवन संकुलात झालेल्या एनडीएच्या घटक पक्षांच्या बैठकीत हा सत्कार करण्यात आला. युरोपियन युनियन, न्यूझीलंड तसंच इतर अनेक देशांसोबत झालेल्या व्यापार करारांबद्दल रालोआ नेत्यांनी मोदी यांचं अभिनंदन केलं.

या बैठकीत भाजपचे नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांचाही सत्कार करण्यात आला.

<><><><>

शेअर बाजारात या कराराचे सकारात्मक पडसाद दिसून आले. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ४ हजार दोनशे पेक्षा जास्त अंकांनी उसळला तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी बाराशे अंकांनी वर गेला. सध्या सेन्सेक्स सुमारे एकवीसशे अंकांनी चढला असून ८३ हजार ८००च्या आसपास पोहोचला आहे.

राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी सुमारे ६६० अंकानी वाढला असून २५ हजार ७०० अंकांच्या आसपास व्यवहार करत आहे.

<><><><>

देशात यंदाच्या रबी हंगामात पेरणी क्षेत्रात १५ लाख हेक्टरनं वाढ झाली आहे. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं ही माहिती दिली. ३० डिसेंबरपर्यंत ६७६ लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर पेरणी झाली आहे. यंदा ३३५ लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रावर गहू, तर ४५ लाख हेक्टरवर भाताची पेरणी झाली आहे. कडधान्याचा पेरा १३९ लाख हेक्टरवर झाला आहे. कृषी विभागाच्या अहवालानुसार भरड धान्यांची पेरणी ६१ लाख हेक्टर, तर ९७ लाख हेक्टर क्षेत्रावर तेलबियांची लागवड झाली आहे.

**<><><><>**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची पुणे आणि बीडच्या पालकमंत्रीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचा शासन आदेश आज जारी करण्यात आला. यापूर्वी या दोन्ही जिल्ह्यांचं पालकमंत्रीपद अजित पवार यांच्याकडे होतं.

दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदासाठीचे आपण दावेदार नाही, असं वरिष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांनी स्पष्ट केलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते.

**<><><><>**

नाशिक महानगरपालिकेच्या महापौरपदासाठी भाजपने हिमगौरी आडके आणि उपमहापौर पदासाठी मच्छिंद्र सानप यांना उमेदवारी दिली आहे. शिवसेनेकडून महापौर पदासाठी रंजना बोराडे यांनी तर उपमहापौर पदासाठी विलास शिंदे, राहुल दिवे आणि प्रविण तिदमे यांनी अर्ज दाखल केले आहेत.

नागपूर महापालिकेत भाजपने महापौर पदासाठी नीता ठाकरे यांना तर उपमहापौर पदासाठी लीला हातीबेद यांना उमेदवारी दिली आहे. तर काँग्रेसने स्नेहल ठाकरे आणि विवेक निकोसे यांची नावं महापौर आणि उपमहापौर पदाचे

उमेदवार म्हणून जाहीर केली आहेत. येत्या ६ तारखेला महापौर आणि उपमहापौर पदाची निवडणूक होणार आहे.

<><><><><>

हरियाणा इथं  सुरु असलेल्या ३५व्या  किशोर आणि किशोरी राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या दोन्ही संघांनी उपांत्यपुर्व फेरीत प्रवेश केला आहे. या सामन्यात किशोर गटात महाराष्ट्र संघाने हरयाणाचा, एक डाव १८ गुणांनी तर किशोरी गटात मणिपुरचा,  एक डाव ३३ गुणांनी  पराभव केला.

//<><><><><>//